# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार</u>

**<u>टोकरतलाव रोड, नंदुरबार ता.जि. नंदुरबार</u>**

**दुरध्वनी कमांक : ०२५६४–२१०१५१** **ईमेल आयडी mahdhunansc@aij.gov.in**

म.जा.क्र. (रो.व.वि.) १४८३/२०२४ दिनांकः– ०६/०७/२०२४

**विषय :– जिल्हा व सत्र न्यायालय नंदुरबार करीता जलशीतक यंत्रे (Water collers) व जलशुध्दीकरण यंत्रे** (Water Purifiers) **पुरविणेकरीता निवीदा सादर करणेबाबत...**

उपरोक्त विषयांस अनुसरुन व मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो. नंदुरबार यांचे आदेशान्वये कळविण्यात येते की, म. जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार करीता **१०० लिटर क्षमता असलेले जलशीतक यंत्रे (Water collers) व 5० लिटर क्षमता असलेले जलशुध्दीकरण यंत्रांची (Water Purifiers) आवश्यकता आहे.** त्याकरीता नोदंणीकृत विक्रेत्याकडुन निवीदा मागविण्यात येत आहेत. तरी आपण सदर निविदा जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार टोकरतलाव रोड, नंदुरबार या पत्यावर **<u>सिलबंद पाकिटात</u>** दिनांक १०/०७/२०२४ रोजी किवा त्यापुर्वी साय. ५:०० वाजेपर्यत या कार्यालयात सादर करावी. त्यानंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

## <u>सर्वसाधारण अटी</u>

१. निवीदेतील १०० लिटर क्षमता असलेले जलशीतक यंत्रे ( Water collers ) व 5० लिटर क्षमता असलेले जलशुध्दीकरण यंत्रे ( Water Purifiers ) दर्जा उत्कृष्ट व उच्च प्रतीचा असावा अन्यथा सदरची जलशीतक यंत्रे ( Water collers ) जलशुध्दीकरण यंत्रे ( Water Purifiers ) आपणांस परत करण्यात येईल.

२. सदरील जलशीतक यंत्रे ( Water collers ) जलशुध्दीकरण यंत्रे ( Water Purifiers ) पुरविल्यानंतर संबंधीत विभाग प्रमुखचा समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतरच सदर यंत्राचे देयक सहा. अधिक्षक, रोख व वित्त विभाग यांचे मार्फत पारीत केले जाईल.

३. सदरील जलशीतक यंत्रे ( Water collers ) जलशुध्दीकरण यंत्रे ( Water Purifiers ) जिल्हा न्यायालय, नंदुरबार येथे पोच करण्याची व फिटींग करुन देण्याची व जबाबदारी विक्रेत्यावर राहिल.

४. देयकाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर विक्रत्यास CT-GST पावती देणे बंधनकारक राहिल.

५. उपरोक्त पुरवठा सदरील कार्यालयात स्वखर्चाने कार्यालयीन वेळेत कार्यालयाचे आदेशपत्र मिळाल्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या ०७ दिवसांच्या आत करावा लागेल. तसेच सदर यंत्राचे उधारीचे देयक जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार यांच्या नावाने सादर केल्यानंतर देकांची रक्कम आपणांस अदा करण्यात येईल.

६. सदर निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकारी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार यांचेकडे

राखुन ठेवण्यात आला आहे. तसेच सदर पुरवठादार विक्रेत्याने केलेला पुरवठा समाधानकारक नसल्यास तक्रर प्राप्त झाल्यास दरपत्रक कुठल्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार यांचे कडुन राखुन ठेवण्यात येत आहे.

आदेशावरुन,

प्रबंधक, 6/7/24

जिल्हा व सत्र न्यायालय, **नंदुरबार**

**प्रत योग्य त्याकार्यवाहीस्तव** :–

१. नोटीस बोर्ड, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार,

२. संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार,

**यांना जिल्हा न्यायालयाच्या वेबसाईटवर अपलोड करणेसाठी**